ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# नेपाळच्या महाप्रलयात 538 जणांचा मृत्यू, 85 भारतीय पर्यटकांची सुटका



महाईन्यूज ™



पान 3 वरुन...

महापालिकेच्या अजेंड्यावर २१ महत्त्वाचे विषय

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 28 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## खांद्यावरुन सहज वाहून नेता येणारी मिसाईल भारत खरेदी करणार!

# पाकिस्तान - चिनला धडकी भरणार!



**महाईन्यूज I नवी दिल्ली**

**भारताने आपले लष्करी सामर्थ्य दृढ करण्यासाठी आणखी एक पाऊल उचलले आहे. भारत आता अमेरिकेकडून जॅव्हलिन अँटी-टँक गाईडेड मिसाईल सिस्टीम (ATGM) खरेदी करणार आहे. या मिसाईल सिस्टिमचे वैशिष्ट्ये म्हणजे ही सैनिकांना खांद्यावरुन कोठेही सहजपणे वाहून नेता येणर आहे. भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी शुक्रवारी याची घोषणा केली. यामुळे भारत - अमेरिका यांच्यातील संरक्षण संबध अधिक दृढ होण्याचे संकेत आहेत. या विषयी सांगताना गोर यांनी याला मोठी बातमी म्हटले आहे.**

टँकचा सर्वात कमकुवत भाग त्याचे छत असतो. या मोडमध्ये मिसाईल हवेत सुमारे १५० मीटर उंच जाते आणि थेट वरून टँकच्या छतावर आदळते, ज्यामुळे कितीही जाड आर्मर असलेला टँक एका फटक्यात नष्ट होतो. या एका मिसाईल सिस्टीमची १,७८,००० अमेरिकन डॉलर म्हणजे भारतीय चलनात अंदाजे १.५० कोटी ते १.६५ कोटी इतकी आहे.

भारताच्या लडाख, अरुणाचल प्रदेश यांसारख्या उंच पर्वतीय भागात जड रणगाडे नेणे कठीण असते. जॅव्हलिन हलकी (सुमारे २२ किलो) असल्याने सैनिक पर्वतांवर सहज वाहून नेऊ शकतात. चीन आणि पाकिस्तानच्या टँकला प्रत्युत्तर: शत्रूच्या आधुनिक रणगाड्यांना ४ किमी अंतरावरूनच निष्प्रभ करण्याची क्षमता भारतीय सैन्याला मिळणार आहे.

भारतीय सैन्याने आपत्कालीन खरेदी अंतर्गत ATGM खरेदीसाठी ऑफर आणि स्वीकृती पत्र (LOA) वर स्वाक्षरी केली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि त्यांचे यूएस समकक्ष पीट हेगसेथ यांनी द्विपक्षीय संरक्षण संबंध अधिक दृढ करण्यासाठी 10 वर्षांच्या फ्रेमवर्कवर स्वाक्षरी केली आहे. या क्षेपणास्त्र प्रणाली खरेदीसाठी भारताकडून २०१० पासून प्रयत्न सुरु होते. आता याकरारानुसार पहिल्या टप्प्यात १०० क्षेपणास्त्र प्रणाली भारत खरेदी करणार आहे. ही क्षेपणास्त्र प्रणाली 1990 च्या दशकाच्या मध्यात अमेरिकेच्या सशस्त्र दलांनी समाविष्ट केली होती. तेव्हापासून ते अनेक प्रकारांतून विकसित झाली आहे. बेस मॉडेलची कमाल श्रेणी 2,500 मीटर आहे, तर अधिक प्रगत FGM-148F प्रणाली 4,750 मीटरपर्यंत क्षेपणास्त्रे डागू शकते. यामुळे भारतीय सैन्याच्या 'फायर अँड फॉरगेट' क्षमतेला बळ मिळून पर्वतीय सीमांवरील रणनैतिक ताकद आणखी वाढणार आहे.

### काय आहेत या मिसाईलची वैशिष्ट्ये

- यामध्ये इन्फ्रारेड कॅमेरा आणि थर्मल व्हिजन असते, ज्यामुळे रात्री किंवा धुरामध्येही शत्रूचे टँक स्पष्ट दिसतात. तसेच डिस्पोजेबल ट्यूबमध्ये मिसाईल असते, ज्यामध्ये वॉरहेड आणि रॉकेट मोटर बसवलेली असते.
- CLU (COMMAND LAUNCH UNIT): हा या गनचा मुख्य भाग असतो. सैनिक CLU मधील स्क्रीनद्वारे टँकला लॉक करतो.
- मिसाईलमधील थर्मल/इन्फ्रारेड साधक (SEEKER) टँकच्या उष्णतेचा आणि रचनेचा नकाशा तयार करून त्याच्यावर लक्ष केंद्रित करतो.
- यामध्ये डागल्यानंतर मिसाईलला दिशा दाखवण्याची गरज नसते. मिसाईल स्वतः टँकचा पाठलाग करत अचूक धडकते. त्यामुळे मारा केल्यानंतर सैनिक तात्काळ सुरक्षित स्थळी निघून जाऊ शकतो.
- हे मिसाईल लाँच करताना मागे आगीचा मोठा भडका होत नाही आणि सैनिक बंद खोलीतून किंवा बंकरमधूनही सुरक्षितपणे मारा करू शकतो.

### एक्स पोस्ट करुन दिली बातमी

"मोठी बातमी! भारताने युद्ध-चाचणी केलेली जॅव्हलिन अँटी-टँक सिस्टीम खरेदी करण्याची योजना आखली आहे... यूएस-भारत संरक्षण संबंधात हे एक मोठे पाऊल आहे आणि सह-उत्पादनाच्या शक्यतांचे दरवाजे उघडतील. आमच्या दोन राष्ट्रांमधील प्रतिबद्धता रेकॉर्ड-उच्च पातळीवर आहे," गोर यांनी ट्विट केले.

### काय आहे हे FGM-148 जॅव्हलिन ATGM

FGM-148 जॅव्हलिन ही जगातील सर्वात प्रगत मॅन-पोर्टेबल (एका सैनिकाने खांद्यावरून डागता येणारी) 'फायर अँड फॉरगेट' अँटी-टँक गाईडेड मिसाईल प्रणाली आहे. अमेरिकेतील लॉकहीड मार्टिन आणि रेथिऑन (RAYTHEON) कंपन्यांनी संयुक्तपणे ती विकसित केली आहे. याचे वजन केवळ २२ किलो असते त्यामुळे सैनिक सहजरित्या दुर्गम भागात ज्याठिकाणी इतर वाहने जाऊ शकत नाही तिथे नेऊ शकतो

# ढोल-ताशांवर निर्बंध नको; कर्णकर्कश आवाजावर लगाम हवा!

## गणेशोत्सव नियमांच्या चौकटीतच साजरा करा; लेझर, प्लाझ्मा आणि प्रेशर मिडला खा. मोहोळ यांचा विरोध

**महाईन्यूज । पुणे**

**गणेशोत्सव हा जनतेचा उत्सव असून, तो साजरा करताना नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. कर्णकर्कश आवाज, आवाजाचा अतिरेक, लेझर लाईट्स, प्लाझ्मा आणि प्रेशर मिडला उत्सवात स्थान नसावे. न्यायालयाने आणि कायद्याने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करूनच गणेशोत्सव साजरा झाला पाहिजे, अशी भूमिका खासदार मुरलीधर मोहोळ यांनी पुण्यात माध्यमांशी बोलताना मांडली.**



मोहोळ म्हणाले की, ते स्वतः गणेशोत्सव मंडळाचे कार्यकर्ते असून लोकप्रतिनिधी म्हणूनही उत्सवाशी जोडलेले आहेत. पुण्याच्या गणेशोत्सवाला १३० वर्षांहून अधिक काळाची परंपरा आहे. गणेशोत्सव मंडळांचे कार्यकर्ते वर्षभर सामाजिक काम करत असतात. कोविडच्या काळातही त्यांनी नागरिकांसाठी मोठे योगदान दिले. त्यामुळे उत्सवाचा मूळ गाभा असलेला लोकसहभाग कायम ठेवत पुणेकरांना आनंद देणारा आणि त्यांना अपेक्षित असा गणेशोत्सव झाला पाहिजे.

उत्सवाच्या नावाखाली नागरिक, लहान मुले किंवा ज्येष्ठ नागरिकांना त्रास होईल, अशी कोणतीही भूमिका योग्य ठरणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. डीजे, लेझर लाईट्स आणि ध्वनीमर्यादेबाबत न्यायालयाने दिलेले आदेश आणि नियम पाळलेच गेले पाहिजेत. आवाजाची निर्धारित मर्यादा ओलांडता कामा नये. विशेषतः प्लाझ्मा, प्रेशर मिड तसेच डोळ्यांना इजा होण्याची शक्यता असलेल्या लेझर लाईट्सचा वापर टाळला पाहिजे, असे मोहोळ यांनी सांगितले.

दरम्यान, पारंपरिक ढोल-ताशा पथकांबाबत पोलिसांनी अवाजवी निर्बंध लादू नयेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. ढोल-ताशा ही आपली पारंपरिक वाद्ये असून, त्यांचा गणेशोत्सवाशी असलेला संबंध जुना आहे. त्यामुळे ढोल-ताशा पथकांबाबत पोलिसांनी फार कडक भूमिका घेऊ नये, असे ते म्हणाले.

गणेशोत्सव साजरा करताना नियमांचे भान ठेवले, तर वर्षभरात साजरे होणारे इतर सण, उत्सव आणि जयंत्यांनाही त्यातून योग्य दिशा मिळेल. सण आणि उत्सव उत्साहात साजरे करावेत; मात्र त्याचवेळी पुणेकरांच्या हिताचा आणि लोकभावनेचा आदर राखत नियमांच्या चौकटीतच उत्सव साजरा करावा, असे आवाहन मोहोळ यांनी केले.

### पारंपरिक वाद्यांना मुभा, लेझरला विरोध...

ढोल-ताशा ही आपली पारंपरिक वाद्ये असून, त्यांच्यावर पोलिसांनी अवाजवी निर्बंध लादू नयेत. मात्र कर्णकर्कश आवाज, आवाजाचा अतिरेक, प्लाझ्मा, प्रेशर मिड आणि डोळ्यांना इजा होण्याची शक्यता असलेल्या लेझर लाईट्सना गणेशोत्सवात थारा नसावा, अशी भूमिका खासदार मुरलीधर मोहोळ यांनी मांडली.

# बारामतीत पहाटे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केली विविध विकासकामांची पाहणी



**महाईन्यूज । बारामती**

**बारामती परिसरातील विकासकामांची पाहणी करताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी शुक्रवारी सकाळी प्रत्यक्ष दौरा करून कामांच्या प्रगतीचा आढावा घेतला. जिल्हा क्रीडा संकुलाचे नाव यावेळी उंचावले गेले आणि त्यांनी विश्वास व्यक्त केला की, हे संकुल राज्यातील युवा खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. त्यांनी विकासकामे निर्धारित वेळेत, नियोजनबद्ध पद्धतीने आणि गुणवत्तापूर्णरीत्या पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकारी व यंत्रणांना दिल्या.**

उपमुख्यमंत्री पवार यांनी सकाळी ६ वाजता जिल्हा क्रीडा संकुलाच्या नवीन इमारतीचे बांधकाम पाहिले. २.९६ एकरवर ३४ कोटी ६७ लाख ७ हजार ४३३ रुपये खर्चून उभारण्यात येणारे हे संकुल खेळाडूंना अत्याधुनिक सुविधा आणि उत्तम क्रीडा वातावरण उपलब्ध करणार आहे. संपूर्ण पुणे जिल्ह्यातील खेळाडूंना सराव, प्रशिक्षण आणि स्पर्धांसाठी दर्जेदार व्यासपीठ देण्याच्या दृष्टिकोनातून हे क्रीडा संकुल महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे सांगून उर्वरित कामे नियोजित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या जानवी वीरकर तसेच कबड्डी प्रशिक्षक दादासो आव्हाड यांचा उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यानंतर त्यांनी बारामती येथील रेशीम कोष केंद्राची पाहणी करून माहिती घेतली तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अ‍ॅग्री मॉलच्या बांधकामाची पाहणी केली. प्रकल्पाच्या सद्यस्थितीचा आढावा घेऊन बांधकामाची गती वाढविण्यासोबतच कामाचा दर्जा कायम राखण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. जळोची येथील उपबाजारातील मार्केट कमिटीच्या इमारतीच्या बांधकामाचीही त्यांनी पाहणी केली. विकासकामे केवळ वेळेत पूर्ण होणे महत्त्वाचे नसून त्यांची गुणवत्ता आणि टिकाऊपणाही तितकाच महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. त्यादृष्टीने विशेष दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी नगराध्यक्ष सचिन सातव, उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी चैतन्य कदम, जिल्हा क्रीडा अधिकारी जगनाथ लकडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम, तहसीलदार स्वप्नील रावडे, गटविकास अधिकारी किशोर माने, मुख्याधिकारी पंकज भुसे आदी उपस्थित होते.




# मदतीचा फोन, पोलिसांची धाव अन् महिलेचा जीव वाचला!

**महाईन्यूज । ओतूर (पुणे)**

डायल ११२ वर आलेल्या मदतीच्या कॉलला तातडीने प्रतिसाद देत ओतूर पोलिसांनी साबळेवाडी येथे एका महिलेचे प्राण वाचवले. पोलिसांच्या प्रसंगावधानासोबतच वेळ न दवडता केलेल्या मदतीमुळे संबंधित महिलेला वेळीच वैद्यकीय उपचार मिळू शकले.

साबळेवाडी (ता. जुन्नर) येथील रेश्मा लक्ष्मण साबळे यांनी घरगुती कारणातून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. घटनेची माहिती डायल ११२ द्वारे मिळताच पोलीस हवालदार जनार्दन सापटे आणि महिला पोलीस शिपाई संगीता दिघे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी पोहोचल्यानंतर पोलिसांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून विलंब न करता ॲम्ब्युलन्सशी संपर्क साधला. ॲम्ब्युलन्स वेळेत दाखल झाल्यानंतर महिलेला तातडीने ओतूर येथील रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. सध्या तिची प्रकृती स्थिर असून ती सुरक्षित असल्याची माहिती आहे.

ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. जनार्दन सापटे आणि संगीता दिघे यांनी दाखविलेली तत्परता आणि प्रसंगावधान यामुळे संकटाच्या क्षणी महिलेला आवश्यक मदत मिळाली. या घटनेनंतर ओतूर पोलिसांच्या तत्परतेचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या मदतीसाठी तातडीने धावून जाणे आणि आवश्यक वैद्यकीय मदत उपलब्ध करून देणे, याचे या घटनेतून पुन्हा एकदा प्रत्यंतर आले.

# महापालिकेच्या अजेंड्यावर २१ महत्त्वाचे विषय

## मोशी दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना अर्थसहाय्यापासून अप्पू घराच्या आधुनिकीकरणापर्यंत

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची सप्टेंबर महिन्याची मासिक सर्वसाधारण सभा बुधवार, २ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता प्रशासकीय इमारतीतील यशवंतराव चव्हाण सभागृहात होणार आहे. नगरसचिव मुकेश खेमा कोळप यांनी याबाबतची नोटीस सर्व सदस्यांना पाठवली असून, सभेच्या कार्यपत्रिकेवर तब्बल २१ विषय ठेवण्यात आले आहेत. मोशी दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना अर्थसहाय्य, अप्पू घर उद्यानाचे आधुनिकीकरण, महापालिका कर्मचाऱ्यांचा बोनस, पाणीपुरवठा प्रकल्प, मेट्रो निओ आणि पार्किंग धोरण यांसह विविध महत्त्वाच्या विषयांवर या सभेत निर्णय होण्याची शक्यता आहे.**




मोशी येथील वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प परिसरात ८ जुलै २०२६ रोजी झालेल्या दुर्घटनेत महापालिकेच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांसह काही नागरिकांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेतील नऊ मृतांच्या कायदेशीर वारसांना प्रत्येकी १० लाख रुपये, असे एकूण ९० लाख रुपयांचे सानुग्रह अर्थसहाय्य मंजूर करण्याचा प्रस्ताव सभेपुढे आहे. ही मदत विशेष बाब म्हणून एकवेळचीच राहणार असून, भविष्यात याचा दाखला म्हणून वापर करता येणार नाही, अशी अट प्रस्तावात नमूद करण्यात आली आहे.

शहरातील जुने आणि लोकप्रिय 'अप्पू घर' उद्यान आधुनिक करण्याचाही प्रस्ताव सभेत मांडण्यात आला आहे. सुमारे १८.६० कोटी रुपयांची खासगी गुंतवणूक अपेक्षित असून, नवीन थीम पार्क, फूड कोर्ट, आधुनिक राईड्स, सीसीटीव्ही आणि अग्निसुरक्षा यंत्रणा उभारण्याचे नियोजन आहे. यासाठी विद्यमान करारात सुधारणा करून भाडेवाढीसह करार मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव आहे. भोसरी स्मशानभूमीतील विद्युत व गॅस दाहिनीच्या देखभाल-दुरुस्तीच्या कामासाठी वाढलेल्या खर्चामुळे सुमारे २ कोटी ६७ लाख रुपयांच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचाही विषय आहे.

महापालिका कर्मचारी महासंघाच्या मागणीनुसार सन २०२५-२६ ते २०२९-३० या पाच वर्षांसाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना ८.३३ टक्के प्रथा बोनस आणि २५ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याचा प्रस्तावही मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे. शहराची वाढती पाण्याची गरज लक्षात घेता भामा आसखेड प्रकल्प, निगडी जलशुद्धीकरण केंद्राची क्षमतावाढ आणि आंद्रा पाईपलाईन प्रकल्पासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता व वाढीव तरतुदींवरही चर्चा होणार आहे.

महापालिका शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यासाठी १५ कोटी रुपयांची तरतूद करण्याचा प्रस्ताव आहे. तसेच प्रभाग क्रमांक २८ व २९ मधील स्मशानभूमींमध्ये विद्युत दाहिनी बसविण्याचा विषयही कार्यपत्रिकेवर आहे. नाशिक फाटा ते वाकड मार्गावर इलेक्ट्रिक रॅपिड ट्रान्झिट सिस्टीम अर्थात 'मेट्रो निओ' प्रकल्पाच्या तपशीलवार अहवालास मान्यता देण्याचा प्रस्ताव असून, शहरातील बेशिस्त पार्किंगला आळा घालण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सर्वसमावेशक पार्किंग धोरणासही मंजुरी अपेक्षित आहे.

याशिवाय दापोडी येथील तलाठी कार्यालयासाठी महापालिकेची जागा भाडेतत्त्वावर देणे, प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या जलनिःसारण जोडणी शुल्क आकारणी, शाळांच्या ना-हरकत प्रमाणपत्रासाठी प्रमाणित कार्यपद्धती तयार करणे, वाय.सी.एम. रुग्णालयाच्या नवीन ११ मजली इमारतीला 'वाय.सी.एम. विद्यासदन' असे नामकरण, सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांसाठी स्वतंत्र शौचालय धोरण आणि महापौर निवासस्थानाजवळ द्वितीय सुविधा केंद्र उभारण्याचे प्रस्ताव आहेत.

दरम्यान, नगरसदस्य विनोद जयवंत नढे यांनी जन्म-मृत्यू नोंदणीतील विलंब व अनियमिततेबाबत लेखी प्रश्न उपस्थित केले आहेत. २०१८ ते २०२३ या कालावधीतील कंत्राटी कामातील अनियमितता, डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालयातील जन्म नोंदींचा विलंब, वाराणसीतील मृत्यूची बेकायदेशीर नोंद तसेच कंत्राटी संगणक चालकांच्या अपुऱ्या प्रशिक्षणामुळे होणाऱ्या चुका याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

विकासकामे, पाणीपुरवठा, वाहतूक व्यवस्था, कर्मचारी कल्याण आणि मोशी दुर्घटनाग्रस्तांच्या कुटुंबीयांना मदत अशा विविध महत्त्वाच्या विषयांवर या सभेत काय निर्णय होतात, याकडे पिंपरी-चिंचवड शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

### मोशी दुर्घटनेच्या मदतीकडे लक्ष

मोशी दुर्घटनेतील नऊ मृतांच्या कायदेशीर वारसांना प्रत्येकी १० लाख रुपये, असे एकूण ९० लाख रुपयांचे सानुग्रह अर्थसहाय्य देण्याचा प्रस्ताव महासभेपुढे आहे. विशेष बाब म्हणून ही मदत एकवेळचीच राहणार असल्याचे प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे.

# राजकीय मुद्द्यांना बगल देत महापालिका प्रशासनाचे शहरविकासाला प्राधान्य!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**राजकीय वाद-विवादांना बाजूला सारत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने शहर विकासाला प्राधान्य दिले आहे. त्याचाच भाग म्हणून सप्टेंबर महिन्यातील नियोजित सर्वसाधारण सभा तब्बल १५ दिवस आधी, म्हणजे २ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक प्रलंबित विकासकामे आणि जनहिताचे प्रस्ताव मार्गी लागण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेष म्हणजे, १७ सप्टेंबर २०२६ रोजी नियोजित तहकूब सभा देखील होणार आहे.**




> "स्वीकृत नगरसेवक नियुक्तीचा विषय निव्वळ राजकीय स्वरूपाचा असून तो अद्याप अपूर्ण व अर्धवट अवस्थेत आहे. अशा एका मुद्द्यामुळे पाणीपुरवठा, आरोग्य, पायाभूत सुविधा यांसारख्या नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या विषयांचे निर्णय रखडवणे योग्य नाही. त्यामुळे हा विषय सध्या बाजूला ठेवण्यात आला असून, १७ सप्टेंबरच्या तहकूब सभेत त्यावर चर्चा होईल. सभागृहात राजकारणापेक्षा जनतेचे प्रश्न सोडवण्यावर भर द्यावा, ही आमची भूमिका कायम राहील." - **प्रशांत शितोळे, सत्तारूढ पक्षनेते, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

२० ऑगस्ट रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत 'वंदे मातरम्' गीताच्या सन्मानार्थ सभा तहकूब करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर पुढील नियमित सभा १७ सप्टेंबरला होणार होती. मात्र, यामुळे भामा आसखेड व निगडी जलशुद्धीकरण प्रकल्प, भोसरी स्मशानभूमीतील विद्युत दाहिनी, मोशी दुर्घटनाग्रस्तांना अर्थसहाय्य आणि अप्पू घर नूतनीकरण यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवरील निर्णय लांबणीवर पडण्याची शक्यता होती.

दरम्यान, ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात प्रस्तावित पार्किंग पॉलिसी, स्वच्छतागृह नियोजन आणि मेट्रो विस्ताराच्या प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. सर्वपक्षीय नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी यावेळी सूचना मांडल्या. त्यानंतर भारतीय जनता पक्षाचे पक्षश्रेष्ठी, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप यांच्यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार विकासकामांना प्राधान्य देण्यात आले. नगरसचिव कार्यालयाने पुढाकार घेत २ सप्टेंबरला सभा घेण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे २१ महत्त्वाचे विषय १५ दिवस आधीच चर्चेला येणार आहेत.

गेल्या काही महिन्यांत स्वीकृत नगरसेवक नियुक्तीच्या मुद्द्यावरून सभागृहाचे कामकाज वारंवार तहकूब झाले. महापालिकेतील १० स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीमध्ये भाजपला सात, तर राष्ट्रवादी काँग्रेसला तीन जागा मिळणार आहेत. राष्ट्रवादीने तीन नावे सादर केली असून, भाजपची सात नावे अद्याप निश्चित झालेली नाहीत. त्यामुळे प्रस्ताव अपूर्ण असल्याने तो सध्या बाजूला ठेवण्यात आला आहे.

हा विषय १७ सप्टेंबरच्या तहकूब सभेत चर्चेला येणार आहे. शहरातील पाणीपुरवठा, आरोग्य, पायाभूत सुविधा, पार्किंग धोरण आणि शाळांमधील सुरक्षा यांसारखे नागरिकांशी संबंधित विषय मात्र आता प्राधान्याने मार्गी लागण्याची शक्यता आहे.



## भूमिका

**पावसाळा सुरू झाला की सामान्यांच्या मनात दोन कारणांनी भीती दाटून येते. एक म्हणजे पावसामुळे जनजीवन विस्कळीत होणे, रस्त्यांना पडणारे खड्डे आणि त्या खड्ड्यांमुळे होणारे अपघात. दुसरे कारण म्हणजे पावसाबरोबर येणारे सण-उत्सव. गणेशोत्सव, दहीहंडी यांसारखे सण आनंद, भक्ती आणि सामाजिक एकोपा वाढवण्यासाठी असतात.**

# सण साजरे करा; जीव धोक्यात नको!



मात्र, गेल्या काही काळात या उत्सवांचे स्वरूप बदलले आहे. भक्तिपेक्षा स्पर्धा, दिखावा, दणदणाट आणि शक्तिप्रदर्शन यांना अधिक महत्त्व मिळू लागले आहे.

उत्सवातील आनंदापेक्षा सामान्य नागरिकांना होणारी पीडा अधिक महत्त्वाची ठरू लागली, ही चिंतेची बाब आहे. संत तुकाराम महाराजांनी 'परपीडा ते पाप' असा स्पष्ट संदेश दिला. मात्र, आजच्या उत्सवांमध्ये परपीडेलाच जणू प्रतिष्ठा मिळत आहे. दुर्दैव म्हणजे या विकृत स्पर्धेचे बळी आता उत्सवाच्या आयोजकांनाही ठरू लागले आहेत. अलीकडे २२ फूट उंच आणि काही टन वजनाची गणेशमूर्ती मंडपाकडे नेताना झालेली दुर्घटना याचे गंभीर उदाहरण आहे. मूर्ती पूर्णपणे वाळण्याआधीच ती हलवण्याचा आग्रह धरला गेला. रस्त्यांवरील खड्डे, मूर्तीला बसणारे धक्के, तिचे स्थैर्य आणि वाहतुकीदरम्यान घ्यावयाची काळजी यांचा पुरेसा विचार करण्यात आला नाही. परिणामी मूर्तीने आपले स्थान सोडले आणि काही जणांना अक्षरशः चिरडले. त्यात दोघांचा मृत्यू झाला. त्यापैकी एक आपल्या कुटुंबातील एकमेव कमावता होता. एका क्षणाच्या निष्काळजीपणामुळे त्या कुटुंबाचे आयुष्यच उद्ध्वस्त झाले. दहीहंडीच्या बाबतीतही दरवर्षी अशीच परिस्थिती दिसते. हंडी अधिकाधिक उंच करण्याच्या नादात अनेक गोविंदांना दुखापती होतात. काही जण कायमचे जायबंदी होतात, तर काही कुटुंबांचा आधारच हिरावला जातो. मग हा उत्सव नेमका कोणासाठी? माणसांच्या जीवाची किंमत मोजून साजरा होणारा उत्सव आनंदाचा कसा असू शकतो? गणेशमूर्तींच्या उंचीची स्पर्धाही दिवसेंदिवस वाढत आहे. कोणी २० फूट, कोणी २५ फूट तर त्याहून अधिक उंच मूर्ती उभारण्याचा प्रयत्न करीत आहे.

ज्या शहरांमध्ये रस्ते, पाणी, वाहतूक आणि स्वच्छतेच्या समस्या आहेत, तेथे अवाढव्य मूर्ती उभारण्यातून काय साध्य होते? उंची वाढवण्यापेक्षा समाजाच्या विचारांची आणि कर्तृत्वाची उंची वाढवणे अधिक आवश्यक आहे. गणेश ही बुद्धीची देवता मानली जाते. मग गणेशोत्सवातच बुद्धी आणि विवेकाचा विसर का पडावा? रस्ते अडवणे, कर्णकर्कश आवाज करणे, प्रचंड रोषणाई करणे आणि नागरिकांना त्रास देणे याला भक्ती म्हणता येणार नाही. महाराष्ट्रात गणेशोत्सवाला सामाजिक प्रबोधनाची परंपरा होती. आज त्या परंपरेतील विवेक पुन्हा जागवण्याची गरज आहे. उत्सवांवर बंदी हा उपाय नाही.

उत्सवांचे स्वरूप बदलणे हा खरा मार्ग आहे. मंडळांनी सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, उंचीच्या स्पर्धेला आळा घालावा आणि समाजोपयोगी उपक्रमांना महत्त्व द्यावे. प्रशासनानेही नियमांची कठोर अंमलबजावणी करावी. उत्सवाचा खरा अर्थ भक्ती, शिस्त, विवेक आणि समाजहित यात आहे. माणसांचे जीव धोक्यात घालून केलेला उत्सव हा उत्सव नसून विकृती आहे. त्यामुळे आता तरी आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. गणपतीच्या मूर्तीखाली माणसे चिरडून मरू लागल्यानंतर तरी आपल्याला अक्कल येणार का?

## प्रासंगिक »

### चुकीची सोय

**एका शहरातील सरकारी कार्यालयात देशमुख नावाचे अधिकारी होते. त्यांच्याकडे कामाचा मोठा ताण होता. एके दिवशी एका मंत्र्यांच्या जवळच्या व्यक्तीने फोन करून सांगितले, "माझा माणूस काही दिवस तुमच्या कार्यालयात ठेवा. तो तुमची खूप मदत करेल."**

देशमुखांनी नियम तपासले. त्या व्यक्तीची नियुक्ती करण्याची कोणतीही तरतूद नव्हती. तरीही वरिष्ठांकडून दबाव वाढत गेला. शेवटी देशमुखांनी स्पष्ट शब्दांत नकार दिला. काही दिवसांनी कार्यालयातील महत्त्वाची कागदपत्रे गायब झाल्याचे लक्षात आले.

चौकशी सुरू झाली. अनधिकृतपणे नेमलेल्या कर्मचाऱ्यांमुळे कागदपत्रांची गोपनीयता धोक्यात आल्याचे समोर आले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी देशमुखांना विचारले, "तुम्ही दबावाला बळी का पडलात नाही?" देशमुख शांतपणे म्हणाले, "सरकारी खुर्चीवर बसलो आहे, कोणाच्या वैयक्तिक खुर्चीवर नाही. आज नियम मोडून सोय केली असती, तर उद्या त्याची किंमत संपूर्ण कार्यालयाला मोजावी लागली असती." त्या घटनेनंतर कार्यालयात कोणालाही नियमबाह्य नियुक्ती देण्यात आली नाही.

- तात्पर्य : **क्षणिक सोयीसाठी नियम मोडले, तर त्याचे परिणाम संपूर्ण व्यवस्थेला भोगावे लागतात.**

मंत्री कार्यालयात 'लोन बेसिस'वर अधिकारी-कर्मचारी नेमण्याला चाप लावण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. मात्र, या निर्णयावर लगेच टाळ्या वाजवण्यापेक्षा एक प्रश्न विचारणे आवश्यक आहे.

## उसनवीरांना लगाम; आता अंमलबजावणीची कसोटी!



हा आदेश कागदावरच राहणार की प्रत्यक्षात मंत्र्यांच्या मनमानीला लगाम घालणार? कारण प्रशासनात आदेश निघणे ही नवी गोष्ट नाही; त्यांची काटेकोर अंमलबजावणी होणे ही खरी कसोटी आहे. 'उसनवारी' म्हणजे दुसऱ्या विभागातील कर्मचारी आपल्या मंत्री कार्यालयात आणणे.

अनेकदा मंजूर आकृतिबंधापेक्षा अधिक कर्मचारी अशा पद्धतीने कार्यालयात बसविले जातात. विशेष म्हणजे त्यांचा पगार मूळ विभागातूनच सुरू राहतो. म्हणजे माणूस एका ठिकाणी, पगार दुसऱ्या ठिकाणी आणि जबाबदारीची निश्चिती मात्र संदिग्ध! अशी व्यवस्था प्रशासनासाठी धोकादायक आहे. राज्य शासनाने कॅबिनेट मंत्र्यांच्या कार्यालयासाठी पीएसपासून शिपायापर्यंत १५ पदांचा आकृतिबंध निश्चित केला आहे, तर राज्यमंत्र्यांच्या कार्यालयासाठी १२ पदे मंजूर आहेत. या मर्यादेपलीकडे कर्मचारी घेता येत नाहीत. मात्र नियमांच्या चौकटीत काम करण्याऐवजी ती चुकविण्यासाठी 'उसनवारी'ची पळवाट शोधली गेली तर नियमांचा अर्थच उरत नाही. मंत्र्यांची संख्या ४० आणि उसनवारीवरील कर्मचारी ३३० असल्याचे चित्र समोर आले असेल, तर ही बाब गंभीर आहे. काही कार्यालयांत तर मंजूर मर्यादेपेक्षा मोठ्या संख्येने कर्मचारी कार्यरत असल्याची चर्चा आहे. त्यांचा वापर प्रशासकीय कामांबरोबरच वैयक्तिक किंवा राजकीय कामांसाठी होण्याची शक्यता असेल, तर त्याचीही चौकशी झाली पाहिजे. नातेवाईक, राजकीय जवळीक असलेले किंवा विशिष्ट कामे करून देणारे लोक सरकारी व्यवस्थेत शिरकाव करत असतील, तर ही बाब अधिक चिंताजनक ठरते. आदेशाची अंमलबजावणी करताना फोन, शिफारशी आणि दबाव येणार नाहीत, असे मानणे भाबडेपणाचे ठरेल. 'हा आमचा माणूस आहे', 'याच्याशिवाय कार्यालय चालणार नाही' अशा सबबी पुढे केल्या जाऊ शकतात. त्यामुळे १५ सप्टेंबरनंतर मुख्यमंत्री कार्यालय किती ठाम राहते, यावर या निर्णयाचे खरे यश अवलंबून असेल. यासोबतच पीए, पीएस आणि ओएसडी यांच्या नैतिक प्रशिक्षणालाही महत्त्व दिले पाहिजे. नियम, गोपनीयता, हितसंबंधांचा संघर्ष, सरकारी साधनांचा गैरवापर आणि राजकीय दबावाला सामोरे जाण्याचे प्रशिक्षण नियमित झाले पाहिजे. सरकारी सेवेत कौशल्य आवश्यक आहे; पण त्याहून अधिक आवश्यक आहे नैतिकता. मंत्री कार्यालये ही वैयक्तिक प्रभावाची केंद्रे न बनता लोकसेवेची केंद्रे राहिली पाहिजेत. उसनी माणसे परत जाणे आवश्यकच आहे; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे प्रशासनात शिरलेली 'उसनी अनैतिकता' हद्दपार झाली पाहिजे. तेव्हाच या निर्णयाला खऱ्या अर्थाने यश मिळाले, असे म्हणता येईल.

## ।। अभंगवाणी ।।



करावी ते पूजा मनें चि उत्तम ।
लौकिकाचें काम काय असे ॥१॥

कळावें तयासि कळे अंतरींचें ।
कारण तें साचें साचा अंगीं ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# रस्ता-पूल नसल्याची किंमत गर्भवतीच्या जीवावर!

## प्रसववेदना सुरू झाल्यानंतरही रुग्णवाहिका गावात पोहोचेना; स्ट्रेचरवरून नदी पार





महाईन्यूज । गडचिरोली

**रक्षाबंधनाच्या पवित्र दिवशी एकीकडे बहिणीच्या रक्षणाचा संकल्प केला जात असताना, एटापल्ली तालुक्यातील दुर्गम कोईंदूळ गावात मात्र एका गर्भवती मातेला जीव मुठीत घेऊन भर पुरातून प्रवास करावा लागला. २८ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता छाया सुरेश नैताम (वय २६) यांना प्रसववेदना सुरू झाल्याने तातडीने रुग्णालयात नेण्याची गरज निर्माण झाली. मात्र, गावाला जोडणारा पक्का रस्ता आणि नदीवर पूल नसल्याने पुराच्या पाण्यामुळे रुग्णवाहिका गावापर्यंत पोहोचू शकली नाही. अखेर परिस्थितीचे गांभीर्य ओळखून गावकऱ्यांनी छाया नैताम यांना स्ट्रेचरवर झोपविले व भर पुरातून जीव धोक्यात घालून नदी पार केली.**

छाया नैताम यांना कसनसूर प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी एटापल्लीमार्गे हेडरी येथील रुग्णालयात हलविण्यात आल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली. विशेष म्हणजे कोईंदूळमध्ये ही पहिलीच घटना नाही. यापूर्वीही २० जुलै २०२६ रोजी पुष्पा सुनील परसा या गर्भवती महिलेला रस्त्याअभावी तब्बल दीड किलोमीटर स्ट्रेचरवरून रुग्णवाहिकेपर्यंत न्यावे लागले होते. त्या घटनेनंतरही रस्ते व पुलाचा प्रश्न कायम राहिला आणि आता पुन्हा त्याच गावातील दुसऱ्या गर्भवती मातेला भर पुरातून स्ट्रेचरवरून नेण्याची वेळ आली. म्हणजेच मागील घटनेतून प्रशासनाने नेमका कोणता धडा घेतला, असा संतप्त सवाल आता ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

दरवर्षी पावसाळ्यात कोईंदूळसह परिसरातील नागरिकांचा संपर्क तुटतो. नाले व नदीला पूर आल्यावर रुग्णवाहिका गावापर्यंत पोहोचत नाही, तर आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांसमोर सुरक्षित पर्यायही राहत नाही.

### हजारो कोटींचा महसूल, तरी मूलभूत सुविधांसाठी संघर्ष

एटापल्ली तालुका लोहखनिजाच्या समृद्धीमुळे राज्याच्या महसुलात मोठे योगदान देत असतानाही याच तालुक्यातील अनेक दुर्गम गावांना आजही रस्ता, पूल, आरोग्य आणि दळणवळण यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. एका बाजूला लोहप्रकल्पातून शासनाला हजारो कोटींचा महसूल मिळत असल्याचे सांगितले जाते, तर दुसऱ्या बाजूला कोईंदूळसारख्या गावात गर्भवती मातेला पुराच्या पाण्यातून स्ट्रेचरवरून न्यावे लागते. त्यामुळे लोहखनिजातून मिळणारा एवढा मोठा महसूल नेमका कुठे जातो? दुर्गम आदिवासी गावांच्या विकासासाठी त्यातील किती निधी खर्च होतो? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

# लातूरमध्ये १२० वंदे भारत स्लीपर ट्रेनसेटची निर्मिती

महाईन्यूज । लातूर

**महाराष्ट्रातील लातूर येथील मराठवाडा रेल कोच फॅक्टरीमध्ये तब्बल १२० वंदे भारत स्लीपर ट्रेनसेटची निर्मिती करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी रेल विकास निगम लिमिटेड (आरव्हीएनएल) आणि रशियाची ट्रान्समॅशहोल्डिंग यांच्या संयुक्त उपक्रमाला जबाबदारी देण्यात आली आहे. लातूर येथील कारखान्यात या ट्रेनसेटच्या निर्मितीचे काम प्रगतीपथावर आहे.**





या प्रकल्पांतर्गत प्रत्येक ट्रेनसेटमध्ये १६ डबे असणार असून, एकूण १,९२० डब्यांची निर्मिती होणार आहे. आरव्हीएनएल आणि ट्रान्समॅशहोल्डिंगच्या संयुक्त उपक्रमातील कायनेट रेल्वे सोल्युशन्स लिमिटेडकडून ही निर्मिती केली जाणार आहे.

लातूर कारखान्यातील वंदे भारत स्लीपर ट्रेनचा पहिला प्रोटोटाइप तयार करण्याची मुदत यापूर्वी जून २०२६पर्यंत होती. मात्र, आता ही मुदत वाढवून ३१ मार्च २०२७ करण्यात आली आहे. आरव्हीएनएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक सलीम अहमद यांनी कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ही माहिती दिली.

वंदे भारत स्लीपर प्रकल्पामुळे आरव्हीएनएलचा रेल्वे पायाभूत सुविधा क्षेत्राबरोबरच ट्रेनसेट निर्मितीच्या क्षेत्रातही विस्तार होत आहे. लांब पल्ल्याच्या प्रवाशांना वेगवान, आधुनिक आणि आरामदायी स्लीपर सेवा उपलब्ध करून देण्याच्या रेल्वेच्या प्रयत्नांना या प्रकल्पामुळे चालना मिळणार आहे.

दरम्यान, चेन्नईतील इंटिग्रल कोच फॅक्टरीमध्येही अधिक क्षमतेच्या वंदे भारत स्लीपर ट्रेनसेटच्या निर्मितीची योजना आहे. त्यामुळे भविष्यात लांब पल्ल्याच्या मार्गांवर वंदे भारत स्लीपर गाड्यांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

### भारतीय रेल्वेला १५८ प्रकल्प दिले

रेल विकास निगम लिमिटेडने गुंतागुंतीचे रेल्वे पायाभूत सुविधा प्रकल्प राबवण्याची प्रबळ क्षमता विकसित केली आहे. आरव्हीएनएलने आतापर्यंत भारतीय रेल्वेला १५८ प्रकल्प दिले आहेत. यामध्ये नवीन रेल्वे मार्ग, गेज रूपांतरण, रेल्वे मार्गांचे दुहेरीकरण, विद्युतीकरण, कार्यशाळा आणि इतर महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचा समावेश आहे. या प्रकल्पांमुळे १७ हजार किलोमीटरहून अधिक रेल्वे पायाभूत सुविधा निर्माण झाल्या आहेत. महाराष्ट्रासह उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश या राज्यांत मोठ्या प्रमाणावर कंपनीची कामे सुरू आहेत.

# पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याचा संशय

## दुबईमार्गे ८ भारतीय सिमकार्ड पाठवणाऱ्या दिल्लीतील दाम्पत्याला अटक

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने पाकिस्तानस्थित गुप्तचर यंत्रणेसाठी हेरगिरी करणाऱ्या कथित यंत्रणेचे जाळे उघडकीस आणल्याचा दावा केला आहे. या प्रकरणी दिल्लीतील दाम्पत्याला अटक करण्यात आली आहे. मोहम्मद साहिल (२५) आणि त्याची पत्नी समीरा (२१) हे दोघेही २०२४ पासून पाकिस्तानी हँडलर्सच्या संपर्कात असल्याचे तपासात समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले. याबद्दल सविस्तर वृत्त हिंदुस्थान टाइम्सने दिले आहे.**



पोलिसांच्या माहितीनुसार, या दाम्पत्याने भारतीय सिमकार्ड खरेदी करून दुबईमार्गे पाकिस्तानात पाठवले. या सिमकार्डचा वापर पाकिस्तानातून व्हॉट्सअ‍ॅप सुरू करण्यासाठी आणि भारतातील काही व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये सहभागी होऊन भारतीय संरक्षण व्यवस्थेशी संबंधित संवेदनशील आणि गोपनीय माहिती मिळवण्यासाठी करण्यात आल्याचा आरोप आहे.

दक्षिण दिल्लीतील सराय काले खान येथे राहणाऱ्या साहिलला पोलिसांनी अटक केली. त्याच्या मोबाइल फोनच्या शास्त्रीय तपासणीत पाकिस्तानी एजंट्ससोबतचे संदेश सापडल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलिसांच्या माहितीनुसार, साहिलची एका पाकिस्तानी एजंटशी इंस्टाग्रामच्या माध्यमातून ओळख झाली होती. साहिलची पत्नी समीरा हिच्यामार्फत ही ओळख झाल्याचे तपासात समोर आले. त्यानंतर या एजंटने दोघांची एका पाकिस्तानी गुप्तचर अधिकाऱ्याशी ओळख करून दिल्याचा आरोप आहे. आर्थिक फायद्याचे आमिष दाखवून दोघांना त्यांच्यासाठी काम करण्यास तयार करण्यात आले, असे पोलिसांनी सांगितले.

पोलिसांनी सांगितले की, दाम्पत्याच्या चौकशीत पाकिस्तानमधील सूत्रधार आणि भारतातील स्लीपर सेल्स यांच्यातील संपर्काची पद्धत समोर आली आहे. संदेश सुरक्षित राहतील अशा तंत्रज्ञानाचा वापर करून या नेटवर्कचे कामकाज चालत असल्याचेही तपासात उघड झाले, असा पोलिसांचा दावा आहे.

### ८ सिमकार्डसाठी ३० हजार रुपये

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, २०२४ आणि २०२५ मध्ये आठ भारतीय सिमकार्ड दुबईमार्गे पाकिस्तानात पाठवण्यासाठी या दाम्पत्याला सुमारे ३० हजार रुपये देण्यात आले. या सिमकार्डवर पाकिस्तानातून व्हॉट्सअ‍ॅप अकाउंट सुरु करण्यात आले. त्यानंतर या अकाउंटच्या माध्यमातून भारतातील काही व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये प्रवेश मिळवून संवेदनशील माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच भारतीय नागरिकांशी संपर्क साधून माहिती मिळवण्याचा प्रयत्न केल्याचेही तपासात समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले.

### भारतीय सिमकार्ड पाकिस्तानात पाठवल्याचा आरोप

दिल्ली पोलिसांचे विशेष पथक दहशतवादी संघटना, त्यांचे स्लीपर सेल्सवर लक्ष ठेवते. याच पथकाला दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात पाकिस्तानच्या आयएसआयशी संबंधित हेरगिरीचे नेटवर्क सुरु असल्याची माहिती मिळाली होती. तपासादरम्यान या नेटवर्कने दिल्लीमध्ये काही लोकांना लॉजिस्टिक मदतीसाठी सहभागी करून घेतल्याचे आणि त्यांच्यामार्फत भारतीय सिमकार्ड मिळवल्याचे समोर आले. या क्रमांकांवरून पाकिस्तानमध्ये व्हॉट्सअ‍ॅप वापरले जात असल्याचेही तपासात आढळले.

# नेपाळच्या महाप्रलयात ५३८ जणांचा मृत्यू, ८५ भारतीय पर्यटकांची सुटका

**महाईन्यूज । नेपाळ**

**नेपाळच्या महाप्रलयात आत्तापर्यंत ५३८ जणांचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती नेपाळ सरकारने दिली आहे. तसंच नेपाळ सरकारने असंही सांगितलं आहे की आत्तापर्यंत ११७ पर्यटकांची सुटका करण्यात आली आहे. त्यापैकी ८५ पर्यटक हे भारतीय आहेत. नेपाळमध्ये आलेल्या महाप्रलयामुळे हाहाकार माजला आहे.**



भारतीयांच्या सुटकेसाठी केंद्र सरकार सातत्याने दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांच्या संपर्कात असून पूरग्रस्त भागात अडकलेल्या भारतीयांची स्थिती आणि सुरक्षिततेची माहिती घेण्यात येत आहे. हिमस्खलनामुळे तिबेट व नेपाळमध्ये बुधवारी आलेल्या महापुरामुळे एकूण ५३८ हून अधिक जणांचा मृत्यू झाल्याचं आता स्पष्ट करण्यात आलं आहे.

चीनमधील तिबेट सीमेलगतच्या प्रदेशात शुक्रवारी ५.१ रिश्टर स्केलच्या भूकंपाचे तीव्र धक्का बसले आहेत. या भूकंपाच्या धक्क्यांमुळे तिबेटच्या बाजूने असलेल्या धरणाला पुन्हा तडे जाऊन पाणी साचल्याची भीती व्यक्त केली जात आहे. याचा थेट फटका नेपाळला बसला असून, त्रिशुली नदीच्या पाणीपातळीत अचानक मोठी वाढ झाली आहे.

संभाव्य धोका लक्षात घेता नेपाळ प्रशासनाने अलर्ट जारी करत त्रिशुली नदीकाठच्या रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलवण्यास सुरुवात केली आहे. हिंदूस्तान टाईम्सने दिलेल्या बातमीनुसार, नैऋत्य चीनच्या सिचुआन प्रांतातील लाँगचांग शहरात या ५.१ रिश्टर स्केल भूकंपाची नोंद झाली. या भूकंपानंतर सीमेलगतच्या डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणात जमीन खचल्याचे आणि पाण्याचा प्रवाह बदलल्याचे वृत्त आहे.

मिळालेल्या माहितीनुसार चीनने गुरूवारी इशारा दिला होता की बुधवारी जो अचानक पूर आला त्यानंतर भोटे कोशी नदी एक बॅरियर लेक झाली आहे. हा तलाव कधीही ओव्हरफ्लो होण्याची शक्यता आहे. चीनने जर हा बॅरियर लेक तुटला तर पुढच्या ७२ तसात अजून एक मोठा पूर येऊ शकतो असा इशारा देखील दिला आहे. शुक्रवारी सकाळी १०.३० वाजता मिळालेल्या ताज्या माहितीनुसार नेपाळ आणि तिबेटमध्ये आलेल्या या पूरात जवळपास ४६९ लोकांचा मृत्यू झाला आहे.

### नेपाळ पोलिसांचा हायअलर्ट, नागरिकांना सतर्कतेचा इशारा

नेपाळ पोलिसांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X' (ट्विटर) वर पोस्ट करत सर्व आपत्कालीन यंत्रणा, बचाव पथके आणि स्थानिक नागरिकांना तातडीने सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. तिबेटच्या बाजूने धरणाचा विसर्ग किंवा बंधारा फुटल्याने त्रिशुली नदीला मोठा पूर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे नदीकाठच्या भागात असलेल्या सर्वांनी तात्काळ सुरक्षित स्थळी जावे, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे.

# कल्याणी प्रियदर्शन बॉलिवूड साठी सज्ज



हेरा फेरी', 'गरम मसाला', 'भूत बंगला' आणि 'खट्टा मीठा'सारखे गाजलेले चित्रपट दिग्दर्शित करणारे प्रसिद्ध दिग्दर्शक प्रियदर्शन यांची मुलगी आणि मल्याळम चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री कल्याणी प्रियदर्शन आता बॉलिवूडमध्ये डेब्यू करण्यासाठी सज्ज झाली आहे. हिंदी चित्रपटसृष्टीतील तिच्या नव्या प्रवासाची सुरुवात अभिनेता रणवीर सिंहच्या आगामी 'प्रलय' या चित्रपटातून होणार असल्याची माहिती समोर आली आहे. कल्याणी सध्या मुंबईत असून 'प्रलय'च्या चित्रीकरणात व्यस्त आहे. याच दरम्यान तिने सोशल मीडियावर एक खास पोस्ट शेअर करत गेल्या काही महिन्यांतील आठवणी चाहत्यांसोबत शेअर केल्या आहेत. कामाच्या व्यस्त शेड्युलमुळे तिला यंदा कुटुंबासोबत ओणम साजरा करता आला नाही. सहसा ती हा खास सण कुटुंबासोबत साजरा करते आणि त्या क्षणांची झलक सोशल मीडियावरही शेअर करते. मात्र, यावेळी चित्रिकरणामुळे तिला घरापासून दूर राहावे लागले. दरम्यान, कल्याणीने मुंबईतील तिच्या आयुष्यातील काही खास क्षणांचे फोटो इंस्टाग्रामवर पोस्ट केले आहेत. या फोटोंमध्ये तिच्या नव्या घराची झलकही पाहायला मिळते. तसेच यावर्षी एप्रिलमध्ये तिने मुंबईत मित्रांसोबत साजरा केलेल्या वाढदिवसाचे काही फोटोही शेअर केले होते. मात्र, या सर्व फोटोंमध्ये चाहत्यांचे सर्वाधिक लक्ष वेधून घेतले ते 'प्रलय' चित्रपटाच्या स्क्रिप्टने. कल्याणीने फोटोतील एका फोटोत स्क्रिप्टची एक छोटीशी झलक दाखवली आहे. ती लॅप्टॉपवर स्क्रिप्ट वाचताना दिसत आहे. त्यामुळे तिच्या आगामी प्रलय चित्रपटाची चाहत्यांमध्ये उत्सुकता आणखी वाढली आहे. या चित्रपटात ती अभिनेता रणवीर सिंहसोबत स्क्रिन शेअर करताना बघायला मिळणार आहे. कल्याणीने आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, यंदाच्या ओणमच्या काळात ती मुंबईत 'प्रलय'च्या कामात पूर्णपणे व्यस्त होती. त्यामुळे तिला कुटुंबासोबत पारंपरिक ओणम साद्याचा आस्वाद घेता आला नाही. तसेच, नेहमीप्रमाणे पांढऱ्या साडीत फोटो काढता आले नाहीत किंवा सणासुदीच्या खास पोस्टही शेअर करता आल्या नाहीत. त्याऐवजी, गेल्या काही महिन्यांतील काही विखुरलेल्या पण खास आठवणींची झलक तिने चाहत्यांसोबत शेअर केली. तसेच चाहत्यांचा ओणमही आनंदात आणि उत्साहात साजरा झाला असेल, अशी शुभेच्छाही अभिनेत्रीने दिली.

# मोठी बहीण असणं महागात पडतं!



रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा आणि जिव्हाळ्याचा सण आहे. अभिनेत्री तापसी पन्नूही हा सण आपल्या कुटुंबासोबत उत्साहाने साजरा करते. मात्र तिच्यासाठी रक्षाबंधन म्हणजे फक्त एक-दोन भावांना राखी बांधणे एवढे सोपे नाही. तिच्या कुटुंबात चुलत भावंडांची संख्या मोठी असल्याने तिचा रक्षाबंधनाचा दिवस बराच व्यस्त असतो. नुकत्याच दिलेल्या एका खास मुलाखतीत तापसीने रक्षाबंधनाशी संबंधित अनेक मजेदार आठवणी सांगितल्या. तापसीच्या मते, भाऊ-बहिणीचं नातं हे केवळ राखी बांधण्यापुरतं मर्यादित नसतं. एकमेकांना साथ देणे आणि गरज पडल्यास एकमेकांच्या पाठीशी उभे राहणे, हे या नात्याचे खरे महत्त्व आहे. तापसीला तिची छोटी बहीण शगुनही राखी बांधते. याबद्दल बोलताना ती गंमतीने सांगते की, आपण मोठी बहीण असल्यामुळे शगुनकडून राखी बांधून घेण्यासाठी तिलाच सांगते. याशिवाय तिचे अनेक चुलत भाऊ आहेत. त्यामुळे रक्षाबंधनाचा तिचा उत्सव एका दिवसापुरता किंवा एका ठिकाणापुरता मर्यादित राहत नाही. तापसी दिल्लीमध्ये असेल तर ती स्वतः सर्व भावांना राखी बांधते. मात्र ती दुसऱ्या शहरात असेल तर भावांना राखी पाठवते. त्यामुळे तिच्यासाठी रक्षाबंधन म्हणजे दोन मिनिटांत राखी बांधून संपणारा कार्यक्रम नाही, तर कुटुंबातील अनेक सदस्यांना जोडणारा खास दिवस आहे. तापसीने रक्षाबंधनातील गिफ्टबाबतही मजेशीर किस्सा सांगितला. तिचे अनेक चुलत भाऊ तिच्यापेक्षा लहान आहेत. त्यामुळे राखी बांधल्यानंतर त्यांना भेटवस्तू देण्याची जबाबदारीही तिच्यावरच येते. मोठी बहीण असल्याचा फायदा असा की, सगळे आपल्याला मोठी बहीण मानतात. मात्र त्याचबरोबर सगळ्यांसाठी गिफ्ट घेण्याचा खर्चही करावा लागतो. त्यामुळे मोठी बहीण असणे थोडे महाग पडते, असे तापसीने विनोदी अंदाजात सांगितले. रक्षाबंधनाच्या दिवशी तयार होण्यासाठी तापसी फार मोठी तयारी करत नाही. कपडे निवडण्यासाठी बराच वेळ घालवण्याऐवजी ती आपल्या कपाटातून दिसतील त्यापैकी आवडणारा आणि थोडा आकर्षक वाटणारा पोशाख निवडते. तिच्या मते, कपडे निवडण्यातच अर्धा दिवस गेला तर सण साजरा कधी करणार? त्यामुळे जे आवडेल ते घ्यायचे, घालायचे आणि कुटुंबासोबत सणाचा आनंद घ्यायचा, असा तिचा साधा फंडा आहे.

# 'टॉक्सिक'ची दुसऱ्या दिवशी घसरण

दाक्षिणात्य सुपरस्टार यशचा बहुचर्चित 'टॉक्सिक' चित्रपट २६ ऑगस्टला मोठ्या अपेक्षांमध्ये सिनेमागृहात प्रदर्शित झाला. प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर दमदार सुरुवात करत १०० कोटींचा टप्पा पार केला. मात्र, पहिल्या दिवसाच्या तुलनेत दुसऱ्या दिवशी चित्रपटाच्या कमाईत मोठी घट झाल्याचे समोर आले आहे. 'टॉक्सिक' हा मेगा बजेट चित्रपट असून त्याचे दिग्दर्शन गीतू मोहनदास यांनी केले आहे. चित्रपटात यशसोबत कियारा आडवाणी, हुमा कुरेशी, नयनतारा, रुक्मिणी वसंत आणि तारा सुतारिया यांसारखे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. त्यामुळे प्रदर्शनापूर्वीपासूनच या चित्रपटाची मोठी चर्चा होती. 'टॉक्सिक'ने पहिल्याच दिवशी बॉक्स ऑफिसवर १०१.१० कोटी रुपयांची कमाई केल्याचे आकडे समोर आले होते. विशेष म्हणजे हिंदी भाषिक प्रेक्षकांकडून चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळाला. पहिल्या दिवशी हिंदीमध्ये चित्रपटाने तब्बल ५५ कोटी रुपयांचा व्यवसाय केल्याचे सांगण्यात आले. त्याचबरोबर कन्नडमध्ये २३.३० कोटी, तेलुगूमध्ये १६ कोटी, तमिळमध्ये ५.५० कोटी आणि मल्याळममध्ये १.३० कोटी रुपयांची कमाई झाली. या दमदार सुरुवातीमुळे 'टॉक्सिक'ने पहिल्याच दिवशी १०० कोटींचा टप्पा पार करणाऱ्या भारतीय चित्रपटांच्या यादीत स्थान मिळवले. पहिल्या दिवशी शतक ठोकणाऱ्या 'टॉक्सिक'च्या कमाईत दुसऱ्या दिवशी मात्र घसरण झाली. उपलब्ध आकडेवारीनुसार, गुरुवारी चित्रपटाने सुमारे ३६.४० कोटी रुपयांची कमाई केली.



# भारतीय महिला हॉकी संघाचे पाचवे स्थान

## १९७४ मधील पदार्पणाच्या विश्वचषकानंतरची स्पर्धेतील ठरली सर्वोत्तम कामगिरी

**महाईन्यूज I कोलंबो**

**उत्तरार्धात दाखवलेल्या धडाकेबाज खेळाच्या जोरावर भारतीय महिला हॉकी संघाने आज (दि. २७) जर्मनीचा ३-१ असा पराभव केला. या शानदार विजयासह भारताने २०२६ च्या महिला हॉकी विश्वचषकात पाचवे स्थान निश्चित केले. १९७४ मधील पदार्पणाच्या विश्वचषकात मिळवलेल्या चौथ्या स्थानानंतरची ही भारताची या स्पर्धेतील सर्वोत्तम कामगिरी ठरली आहे.**




उत्तरार्धात भारतीय संघ जिंकण्याच्या निर्धारानेच मैदानात उतरला. ३८ व्या मिनिटाला ज्योती दुखापतग्रस्त होऊन मैदानाबाहेर गेल्याने भारताला मोठा धक्का बसला. मात्र, खचून न जाता अवघ्या पाच मिनिटांतच (४३ वे मिनिट) इशिका चौधरीने वैयक्तिक कौशल्याच्या जोरावर विलोभनीय गोल करत भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली.या धक्क्यातून जर्मनी सावरण्यापूर्वीच, ४४ व्या मिनिटाला मिळालेल्या पेनल्टी कॉर्नरवर नवनीत कौरने चेंडूला जाळीची वाट दाखवत भारताची आघाडी २-० अशी दुप्पट केली. अवघ्या दोन मिनिटांत सामन्याचे चित्र पूर्णपणे पालटले.

अंतिम सत्राच्या सुरुवातीलाच (४७ वे मिनिट) नवनीत कौरने गोलरक्षकाला चकवत अत्यंत संयमीपणे दुसरा वैयक्तिक गोल नोंदवला आणि भारताला ३-० अशी मजबूत आघाडी मिळवून दिली. सामन्याच्या ५९ व्या मिनिटाला जर्मनीच्या लिन क्रिंग्सने गोल करत पिछाडी ३-१ अशी कमी केली. शेवटच्या काही सेकंदात जर्मनीला पेनल्टी कॉर्नर मिळाला, मात्र भारतीय बचावाने धोका टाळत ३-१ अशा ऐतिहासिक विजयावर शिक्कामोर्तब केले.

भारतीय खेळाडूंनी संपूर्ण सामन्यात आक्रमक आणि आत्मविश्वासपूर्ण खेळाचे दर्शन घडवले. जर्मनीसारख्या बलाढ्य संघाविरुद्ध भारतीय बचावफळीनेही शानदार कामगिरी करत प्रतिस्पर्ध्यांना अनेकदा रोखले. मध्यंतरानंतर भारतीय संघाने सामन्यावर पूर्णपणे वर्चस्व मिळवत अवघ्या चार मिनिटांत दोन गोल करत जर्मनीला धक्का दिला. नवनीत कौरच्या दमदार कामगिरीने भारताच्या विजयाचा पाया आणखी मजबूत झाला. अखेर भारतीय संघाने जर्मनीवर ३-१ असा दणदणीत विजय मिळवत आपल्या जिद्दीचे आणि गुणवत्तेचे दर्शन घडवले.

या विजयामुळे भारतीय महिला हॉकी संघाच्या कामगिरीला नवी उंची मिळाली आहे. बलाढ्य जर्मनीला पराभूत करत भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली ताकद पुन्हा एकदा सिद्ध केली. निर्णायक क्षणी गोल करत भारतीय खेळाडूंनी दबावाचे रूपांतर संधीमध्ये केले. हा विजय भारतीय महिला हॉकीच्या उज्वल भविष्यासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

### जर्मनीचे वर्चस्व, भारताचा बचाव अभेद्य

दोन्ही संघांनी सावधगिरीने खेळ केला. कर्णधार सलिमा टेटेने आक्रमक चाली रचल्या, परंतु जर्मनीने हळूहळू सामन्यावर पकड मिळवत भारतीय बचावावर दबाव वाढवला. जर्मनीला पेनल्टी कॉर्नरही मिळाला, मात्र गोलरक्षक बिचू देवीने उत्कृष्ट बचाव करत जर्मनीची संधी उधळली.दुसऱ्या सत्रातही जर्मनीचेच वर्चस्व पाहायला मिळाले. १८ व्या मिनिटाला मिळालेला पेनल्टी कॉर्नर भारतीय खेळाडूंनी हाणून पाडला. यानंतर मध्यंतरापूर्वी सलिमा टेटे आणि नवनीत कौर यांनी गोल करण्याचे सुरेख प्रयत्न केले, पण जर्मनीच्या गोलरक्षकाने बचाव करत मध्यंतरापर्यंत गोलशून्यता कायम ठेवली.

# अनाया बांगरला ऑस्ट्रेलियात खेळण्याची परवानगी मिळताच स्टार खेळाडूची प्रतिक्रिया

**महाईन्यूज I नवी दिल्ली**

**भारताचे माजी क्रिकेटपटू संजय बांगर यांची मुलगी अनाया बांगर पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. अनायाला क्रिकेटवर किती प्रेम आहे हे तिने अनेकदा आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवर व्हिडीओ शेअर करुन व्यक्त केलं आहे. अनेकदा ती क्रिकेट खेळतानाही दिसून आली आहे. लिंग पुष्टीकरणाची शस्त्रक्रिया केल्यानंतर ती क्रिकेटच्या मैदानापासून दूर होती.**



पण आता ती पुन्हा एकदा क्रिकेटच्या मैदानावर परतणार आहे. यावेळी ती उच्च स्तरावर क्रिकेट खेळताना दिसून येणार आहे. तिला ऑस्ट्रेलियामध्ये कम्युनिटी क्रिकेट खेळण्याची परवानगी मिळाली आहे. यासह ती ऑस्ट्रेलियातील वुमन्स बिग बॅश लीग स्पर्धेसाठीही पात्र ठरु शकते. यावरुन दक्षिण आफ्रिकेची स्टार खेळाडू मॅरिझान कॅपने विरोध करत मोठं वक्तव्य केलं आहे.

अनाया बांगरने पत्रकार परिषद घेऊन ऑस्ट्रेलियातील महिला कम्युनिटी क्रिकेट खेळण्यासाठी मंजुरी मिळाली असल्याची माहिती दिली. अनाया म्हणाली की, “हा माझ्यासाठी खूप आनंदाचा दिवस आहे, विशेषतः मी पुन्हा क्रिकेट खेळू शकते हे समजल्यानंतर मला खूप आनंद झाला आहे. एक वेळ अशी आली होती की मी पुन्हा कधीच क्रिकेट खेळू शकणार नाही, असं मला वाटलं होतं. मात्र, क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे आभार, त्यांनी मला पुन्हा एक संधी दिली.”

पण मॅरिझान कॅपला हा निर्णय मुळीच आवडलेला नाही. मॅरिझान कॅपने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवरुन अनाया बांगरची पोस्ट शेअर केली आहे. यासह तिने आपलं मत देखील मांडलं आहे. ती तिने या पोस्टवर कॅप्शन देत लिहिले की, “हा निव्वळ मूर्खपणा आहे.. या गोष्टीसाठी अजिबात परवानगी दिली जाऊ नये!” क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या निर्णयानंतर या विषयावर मत मांडणारी मॅरिझान कॅप ही पहिलीच महिला क्रिकेटपटू आहे. आणखी काही महिला क्रिकेटपटू याबाबत आपलं मत मांडू शकतात. प्रीमियर क्रिकेटला ‘एलिट क्रिकेट’ऐवजी ‘कम्युनिटी क्रिकेट’ म्हणून वर्गीकृत करण्यात आल्याने त्यात खेळण्यावर या धोरणाचा परिणाम होणार नाही.

### क्रिकेट ऑस्ट्रेलियाने अनायाच्या पत्रावर काय उत्तर दिलं?

क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या Transgender and Gender Diverse Players in Elite Cricket Policyनुसार, एलिट क्रिकेटमध्ये खेळण्यासाठी खेळाडूच्या रक्तातील सीरम टेस्टोस्टेरॉनची पातळी किमान १२ महिने १० nmol/L (नॅनोमोल्स प्रति लिटर) पेक्षा कमी असणं आवश्यक आहे. दरम्यान, २०२३ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) पुरुषत्वाच्या वयात (male puberty) प्रवेश केलेल्या ट्रान्सजेंडर खेळाडूंना एलिट महिला क्रिकेटमध्ये खेळण्यास बंदी घातली होती. दरम्यान, अनायाच्या पत्राला उत्तर देताना क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या इंटिग्रिटी विभागाच्या प्रमुख जॅकी पॅट्रिज यांनी सांगितलं की, मार्च २०२७ पर्यंत अनाया ऑस्ट्रेलियातील कोणत्याही राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशातील प्रीमियर क्रिकेट स्पर्धांमध्ये खेळण्यास पात्र असेल.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज

epaper.mahaenews.com

ePaper

। शनिवार ।
दि. 29 ऑगस्ट 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## ADMISSION OPEN

## SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

**Employability Enhancement Foundational Course In**

**Microcontroller Programming and Interfacing.**



**Eligibility : Second Year Passed B.Sc. (Electronics), Diploma (E&TC /Electronics), B.E./B.Tech (E&TC/Electronics), or Equivalent**

- 10000+ STUDENTS SUCCESSFULLY COMPLETED OUR VARIOUS COURSES
- 25 YEARS OF EXPERIENCE IN EDUCATION
- 100% PLACEMENT ASSISTANCE

Scan the QR code!

Register Now https://www.icit.org.in

VLSI DESIGN & RESEARCH CENTRE

VLSI | Savitribai Phule Pune University | iCiT

Integrated Circuit and Information Technology Pvt. Ltd.,

Department of Electronics and Instrumentation Science,
Savitribai Phule Pune University, Pune 411007
Contact : 8669668900/100, 9922219219
Email : info@icit.org.in /

# जनतेच्या प्रश्नांवर आता थेट ॲक्शन; प्रभाग ८ मध्ये 'जनसंवाद'

## मूलभूत सुविधा, वाहतूक व सुरक्षेच्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाहीचे आश्वासन

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्न समजून घेऊन ते प्रशासनाच्या माध्यमातून मार्गी लावण्यासाठी प्रभाग क्रमांक ८ मध्ये 'जनसंवाद' उपक्रम राबविण्यात आला. चिखली प्राधिकरणातील राजमाता जिजाऊ नगर, सेक्टर क्रमांक ११ व १३ परिसरातील विविध सोसायट्यांच्या प्रतिनिधींशी नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांनी थेट संवाद साधत नागरिकांच्या समस्या, सूचना आणि अपेक्षा जाणून घेतल्या. यावेळी प्रभाग क्रमांक आठ मधील नगरसेविका नम्रता लोंढे, अश्विनी वाबळे, नगरसेवक तुषार सहाणे, माजी नगरसेवक संजय वाबळे तसेच सामाजिक कार्यकर्ते शिवराज लांडगे, योगेश लोंढे आणि परिसरातील नागरिक रहिवाशी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या बैठकीत परिसरातील विविध सोसायटी प्रतिनिधींनी स्थानिक पातळीवरील प्रश्न मांडले. नागरिकांनी आपल्या भागातील मूलभूत सुविधा, पायाभूत विकास, वाहतूक, सुरक्षा तसेच महानगरपालिका व प्राधिकरणाशी संबंधित विविध विषयांकडे नगरसेवकांचे लक्ष वेधले.

नागरिकांनी मांडलेल्या प्रत्येक समस्येची नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांनी गांभीर्याने दखल घेत केवळ समस्या ऐकून न थांबता, संबंधित विभागांशी समन्वय साधून त्यावर ठोस उपाययोजना करण्याची भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

चिखली प्राधिकरण परिसरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत असून, नव्या सोसायट्या आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता नागरिकांना सक्षम पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्या पार्श्वभूमीवर नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेण्याचा 'जनसंवाद' उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.

नागरिक आणि प्रशासन यांच्यातील दुवा म्हणून लोकप्रतिनिधींची भूमिका अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न या माध्यमातून होत असल्याचे या बैठकीतून अधोरेखित झाले. नागरिकांनीही आपल्या समस्या थेट लोकप्रतिनिधीसमोर मांडता येत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

'जनसंवादातून समस्या समजून घेणे आणि समन्वयातून त्या सोडवणे' या भूमिकेतून प्रभाग क्रमांक ८ मधील नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवण्याचा निर्धार यावेळी नगरसेवक डॉ. कांबळे यांनी व्यक्त केला.

> "नागरिकांनी मांडलेले प्रश्न हेच आपल्या विकासकामांचे प्राधान्यक्रम आहेत. प्रत्येक समस्या संबंधित विभागापर्यंत पोहोचवून त्याच्या निराकरणासाठी पाठपुरावा केला जाईल. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) आणि पोलीस प्रशासन यांच्याशी समन्वय साधून आवश्यक ती तातडीची कार्यवाही करण्यात येईल."
>
> **- डॉ. सुहास कांबळे, नगरसेवक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

# 'एसआयआर'च्या प्रारूप यादीत नाव नसेल तर घाबरू नका..!

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (एसआयआर) प्रक्रियेनंतर आता पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांचे लक्ष ३१ ऑगस्टला प्रसिद्ध होणाऱ्या प्रारूप मतदार यादीकडे लागले आहे. शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तीन विधानसभा मतदारसंघांतील १७ लाख २४ हजार ५३७ मतदारांपैकी तब्बल ६ लाख १२ हजार ७२५ मतदार गैरहजर, स्थलांतरित, मयत, दुबार अथवा अन्य कारणांमुळे वगळण्याच्या यादीत आढळले आहेत. त्यामुळे प्रत्येक मतदाराने प्रारूप यादीत आपले नाव आहे की नाही, याची तपासणी करणे महत्त्वाचे ठरणार आहे.**



प्रारूप मतदार यादी ३१ ऑगस्टला प्रसिद्ध होणार असून, ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती दाखल करता येणार आहेत. त्यांचे निराकरण २९ ऑक्टोबरपर्यंत करण्यात येणार असून, अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार आहे.

प्रारूप यादीत नाव नसणे म्हणजे मतदानाचा हक्क कायमचा गमावला, असे नाही. पात्र मतदारांना दावे-हरकतींच्या कालावधीत फॉर्म क्रमांक ६ भरून नाव समाविष्ट करण्यासाठी दावा करता येणार आहे. तसेच नाव, पत्ता, वय, छायाचित्र किंवा अन्य तपशीलात दुरुस्ती असल्यास फॉर्म क्रमांक ८ भरता येणार आहे.

प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर मतदारांनी स्वतःसोबत कुटुंबातील प्रत्येक सदस्याचे नाव तपासावे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, स्थलांतरित झालेले सदस्य, विवाहानंतर पत्ता बदललेल्या महिला तसेच एसआयआरच्या घरभेटीत ज्यांची नोंद राहिली असेल, त्यांच्या नावाची खात्री करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नावासोबत ईपीआयसी क्रमांक, पत्ता, वय, छायाचित्र आणि मतदान केंद्राची माहितीही तपासणे आवश्यक आहे.

२०२५च्या मतदार यादीत नाव असतानाही २०२६च्या प्रारूप यादीत नाव दिसत नसल्यास मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या एसआयआर पोर्टलवरील एएसडीडी (ॲबसेंट, शिफ्टेड, डेड, डुप्लिकेट) सुविधेद्वारे संबंधित नोंद तपासता येणार आहे.

एसआयआर पडताळणीत शहरातील एकूण मतदारांपैकी ३५.५३ टक्के मतदार वगळण्याच्या यादीत आढळले आहेत. पिंपरी विधानसभा मतदारसंघातील ४ लाख १ हजार ९७५ मतदारांपैकी १ लाख ६७ हजार ३९२, चिंचवडमधील ६ लाख ८७ हजार ४४८ पैकी २ लाख ७२ हजार ९८०, तर भोसरीमधील ६ लाख ३५ हजार ११४ पैकी १ लाख ७२ हजार ३५३ मतदार वगळण्याच्या यादीत आहेत.

त्यामुळे ३१ ऑगस्टनंतर प्रारूप मतदार यादी तपासून नाव नसल्यास ३० सप्टेंबरपूर्वी आवश्यक दावा दाखल करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### 'एएसडीडी' यादीतही तपासणीची सोय

२०२५च्या मतदार यादीत नाव असताना २०२६च्या प्रारूप यादीत नाव दिसत नसेल, तर महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या एसआयआर पोर्टलवरील एएसडीडी (ॲबसेंट, शिफ्टेड, डेड, डुप्लिकेट) सुविधेद्वारे संबंधित नोंद तपासता येणार आहे. महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने 'एसआयआर'साठी स्वतंत्र पोर्टलवर एएसडीडी, सुधारित वेळापत्रक आणि मतदारांसाठी मदत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

# Empowering Students with Industry-Ready Skills

## Integrated Placement & Internship Programme Empowers Computer Science Students

**MahaEnews I PIMPRI-CHINCHWAD**

**The Department of Computer Science, has organized an Integrated Placement & Internship Programme for the students of S.Y. and T.Y.B.Sc. CS / B.C.A. Science/ AIML/ CDS in collaboration with Kiran Academy, Pune, on 27 August 2026.**







The programme aimed to provide students with valuable opportunities for industrial training, project-based internships, and placement assistance. The selection process included an Entrance Test, Group Discussion, and Personal Interview, enabling students to experience a professional recruitment process.

The programme was formally introduced by the Head of the Department, Prof. Swapnil More, who highlighted the importance of industry exposure, skill development, internships, and placement opportunities for students.

The program was conducted by Mr. Pradip Kalunke, Senior Technical Trainer of Kiran Academy. Students actively participated in the programme and benefited from information regarding training programmes, scholarships, free Udemy courses, and placement assistance.

The initiative reflects the Department of Computer Science's commitment to enhancing students' employability, industry readiness, and career development by connecting academic learning with practical industry-oriented opportunities.

The program was successfully conducted under guidance of Management, Founder President Hon Mr Vilas Lande, Secretary Hon Sudhir Mungase, Principal Prof. K Y Chaudhari sir, Registrar Mrs. Ashwini Bhosale mam, HOD Prof Swapnil more and all staff.

# FDP on "Personality Development programme"

**MahaEnews I PIMPRI-CHINCHWAD**

**Rajamta Jijau Shikshan Prasarak Mandal's Arts Commerce and Science college organized " A FDP on Personality Development programme" on 27th August 2026.The Guest Ms.Shalu Ramnani aimed to educate faculty about the importance of communication and Also about 7C's of communication,types of listening,importance and implementation while teaching.**





The programme was graced by the Founder President Hon Mr Vilas Lande, Secretary Hon Mr Sudhir Mungase, Principal Prof. Kiran Chaudhari, Register Mrs. Ashwini Bhosale.

The Programme commenced with warm welcome and Introduced the today's Resource Person Ms.Shalu Ramnani by Prof.Shital Alhat and followed by the felicitation ceremony.

The session sucessfully conducted by Ms.Shalu Ramnani.

The speaker also discussed various communication like clarity,concise,complete and coherent. All Faculties actively participated in the 2 session of Faculty Development workshop.

DTE Code 6310

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |



Highest Package for PCET-Nutan **61 Lakh P.A.**

Average Salary Package **5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:

**8830992988 / 7423080910 / 9028101155**




Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507